# चक्रे

## कुंडलिनी जागृतिशिवाय चक्र जागृत (उघडली जाऊ) होऊ शकतात का ?

कुंडलिनी व चक्र ह्या दोन्ही गोष्टी सूक्ष्म देहाशी संबंधित आहेत आणि त्या एकमेकापासून स्वतंत्र आहेत. ही चक्रे व्यक्ति जीवनातील घडणाऱ्या चढ-उतारामुळे आपोआपच जागृत होतात. ही अगदी हळूहळू होणारी प्रक्रिया असून ती व्यक्ति जाणीवपूर्वक जगू लागेपर्यंत ही प्रक्रिया चालू राहाते. ही चक्रे एकदा का उघडली की कुंडलिनी शक्ति मोकळेपणाने वाहू लागते.

तरीसुद्धा एखादी व्यक्ति जलद गतीने ही क्रिया साधू शकते. *हट योग* आणि *क्रिया योग* या पद्धतींचा अवलंब करुन पद्धतशीरपणे ही चक्रे शुद्ध जागृत व संतुलीत करुन हे साधू शकतो या चक्रांचे एकदा का आवश्यक संतुलन व शुद्धिकरण झाले की कुंडलिनी शक्तिला उर्ध्वगामी जाण्यासाठी अडथळा विरहित मार्ग तयार होतो.

## प्राणी विश्वात उत्क्रांती कशा तऱ्हेने होते ? प्राण्यामध्येही चक्रे असतात का ?

सर्व जीवन म्हणजे उत्क्रांती आणि प्राणी विश्वही त्याला अपवाद नाही. जुन्या ग्रंथात मूलाधार चक्रानंतर जी चक्रे आहेत ती प्राणी विश्व दर्शवतात. ती चक्रे अशीः *अताळ, वितळ, सूतळ, तळतळ, रसातळ, महातळ* आणि

सर्वात खालचे *पाताळ*. जसे मूलाधार हे सर्वात खालचे चक्र मानवी शरीरात असते त्याचप्रमाणे प्राण्यांमध्ये पाताळ हे सर्वात खालचे चक्र आहे. मानवी शरीरात शरीरातील उर्जा वाहाण्यासाठी असलेल्या सूक्ष्म नाड्या, आज्ञा चक्राच्या ठिकाणी मिळतात; त्याच प्रमाणे, प्राणी विश्वाचे नियंत्रण नैसर्गिक नियमानुसार असल्यामुळे त्यांची उत्क्रांती आपोआप होते. प्राण्यांच्या शरीरात त्या मूलाधारा चक्राच्या ठिकाणी एकमेकात मिळतात. मानवी शरीरात चक्र जेथून चालू होतात त्या ठिकाणी प्राणी विश्वातील चक्र संपतात.

## मी ध्यानामध्ये असताना चक्राची हालचाल जाणवू किंवा बघू शकतो का ?

जर तुम्ही पूर्ण विश्रांत अवस्थेत जाऊ शकलात तर तुम्हाला चक्रांची जाणीव होईल किंवा तुम्हाला ती दृष्यमान होतील. यामध्ये आपल्या मनाचे प्रयत्न असत नाहीत; ही स्थिती आपोआपच (कोणत्याही प्रयत्नांशिवाय) होते. चक्र ही स्थूल शरीरात नसल्यामुळे ती आपल्या इंद्रियांना जाणवू शकत नाहीत. सूक्ष्म शरीरातील बदलाचा अनुभव घेण्यासाठी आपल्या जाणीवेत बदल केला पाहिजे. हे होण्यासाठी आपले मन 'बाहेरून' काढून 'आत' नेले पाहिजे.

**वेबसाईटवरील तुमच्या लेखामध्ये तुम्ही वर्णन केलेल्या जवळजवळ ८०% गोष्टींचा अनुभव मी घेतला आहे. फक्त एकच गोष्ट मी अनुभवू शकलो नाही ती म्हणजे माझ्या आज्ञा चक्रामध्ये मला काहीही अनुभव आला नाही. हे घडण्याचे कारण काय ?**


जर तुम्ही असा दावा करत असाल की मी वेबसाईटवर सांगितलेल्या गोष्टी ८०% पर्यंत अनुभवलेल्या आहेत तर मग वेबपेजवरील चित्राकृतिंचा अर्थ / संदर्भ तुम्ही कसा लावलात / जोडलात ?

प्रत्येक व्यक्ती तिचा अनुभव तिच्या समजण्याच्या क्षमतेप्रमाणे विषद करते. हे सर्व त्या त्या व्यक्तिची त्या अनुभवाकडे बघण्याची दृष्टी, त्या अनुभवाबद्दलचा समज किंवा भावना यावर अवलंबून असते. यामध्ये जे चक्र महत्वाची कामगिरी करते ते म्हणजे आज्ञा चक्र होय. म्हणून जेव्हा वेबसाईट वरील अनुभव तुम्ही स्वतः अनुभवता त्यावेळी तुमच्या संवेदना किंवा समज यामध्ये एकवाक्यता आहे का ते तपासून पहावे. जर तुम्हाला पिवळा किंवा निळा रंग जाणवला तर कुठल्यातरी पातळीवर ते तुम्ही अनुभवत आहात.

तुम्ही तुमच्या अनुभवाचा आनंद घ्या, जर तुम्ही ३” व्यासाचे काळ्या रंगात एक वर्तुळ पांढऱ्या रंगाच्या पृष्ठभागावर काढलेत व त्याकडे टक लावून पाहिलेत तर तुम्हाला पिवळा रंग दिसेल. म्हणून तुम्हाला आज्ञाचक्र काळे किंवा पिवळे दिसते हे विशेष महत्त्वाचे नाही.

## सहस्त्रार हे चक्र आहे कि केन्द्र आहे ?

साधकाच्या शरीरांत जोपर्यंत बाकीची चक्रे जागृत होत नाहीत तोपर्यंत सहस्त्रारचे कार्य चक्राप्रमाणेच चालते. त्यामुळे ही एक दुसऱ्या चक्रांचे "नियमन करणारी कळ" (स्वीच) असल्यामुळे इतर चक्रांची जागृति योग्य प्रमाणात/योग्य तऱ्हेने झाली आहे की नाही, ज्या कामासाठी ती चक्रे विकसित करण्याचा उद्देश होता त्याप्रमाणे ती चक्रे साधकाच्या शरीरात प्रगत झाली आहेत किंवा नाही हे बघण्याचे काम करते. ती चक्रे प्रगत झाल्यावर हे सर्वोच्च चक्र उघडते व नंतर वैश्विक / पूर्ण जाणीवेशी संपर्क साधते.



सहस्त्रार केन्द्र

*'कॉशश फ्लॉईट इन टू दि इंप्रेइअन'* या पुस्तकात सुरूवातीलाच सर्वोच्च केंद्र उघडलेले नव्हते हे तुमच्या लक्षात आले असेल. बऱ्याच आध्यात्मिक सरावानंतर आणि शरीराच्या, मनाच्या आणि ज्ञानाच्या सर्व पातळ्यांवर सहस्त्रार किंवा सर्वोच्च केंद्र उघडले जाऊन त्याचे रुपांतर सर्व प्रकाराचे ज्ञान ग्रहण करण्याचे एक केंद्र बनले. (*कुंडलिनी अवेकनिंग* – प्रकरण दुसरे – २५ फेब्रुवारी १९९७)

थोडक्यात सहस्त्रार हे केंद्र म्हणून कार्यरत होण्याआधी चक्रांचे शुद्धिकरण किंवा शरीराचे, मनाचे आणि बुद्धिचे शुद्धिकरण होणे आवश्यक आहे.

## जर एखादा साधक सहा चक्र बघू शकत असेल तर ती त्याची आध्यात्मिक प्रगति असते कि तो नुसता भ्रम असतो ?

जेव्हा एखादा साधक सहा चक्र बघू शकत असेल तर त्याचा अर्थ तो चक्रांच्या शुद्धिकरणाची प्रक्रिया बघत असतो.

ज्यावेळी कुंडलिनी शक्ति चक्रातून मार्गक्रमण करते त्यावेळी कुंडलिनी शक्तिची (उर्ध्व) गति स्पष्टपणे जाणवते आणि साधकाला वीजेच्या, हवेच्या किंवा उष्णतेच्या प्रवाहाप्रमाणे तीची जाणव होते. ज्यावेळी मणीपूर चक्र उत्तेजित होते त्यावेळी पोटाच्या हालचाली होतात. अनाहत चक्राच्या हालचालीमुळे आवाज ऐकू येतात. विशुद्धि चक्राच्या उत्तेजित होण्याने साधकाच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात किंवा तो साधक हास्याने ते प्रकट करतो. ज्यावेळी आज्ञाचक्र उत्तेजित होते त्यावेळी 'चित्त' एकाग्र होते आणि त्यांनतर तो साधक ध्यानावस्थेत प्रवेश करतो.

चक्र दृष्यमान होणे हा भ्रम नाही. साधक ज्या आध्यात्मिक मार्गावर प्रवास करत असतो त्यात त्याची जी प्रगति होत असते त्या प्रगतिचे हे द्योतक आहे.